THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 13TH FEBRUARY 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### जनावरांचा छल करण्याची मनाई करण्याविषयीं आक्टाचा मसुदा.

जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्यासाठीं आणखी ठराव करणें ज्या अर्थीं योग्य आहे त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

सरनामा, व्याप्ति व सुरुवात, आणि दुसरे कायदे रद्द करणें.

१. (१) या आक्टास सन १८९० चा जनावरांचा छल करण्याची मनाई करण्याविषयीं आक्ट असें ह्मणावें.

(२) हें कलम सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहे : आणि या आक्टाचा बाकी राहिलेला भाग, स्थानिक सरकार, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन जे स्थानिक प्रदेश ठरवील, त्या प्रदेशांस लागू होईल, आणि तें सरकार तशा जाहिरनाम्याच्या द्वारें जी तारीख नेमील, त्या तारिखेस त्या प्रत्येक प्रदेशांत अमलांत येईल.

(३) या कलमाअन्वयें हा आक्ट कोणत्याहि स्थानिक प्रदेशास लागू केला जाईल तेव्हां, जनावरांचा छळ करण्याची मनाई करण्याविषयीं जो कोणताहि कायदा त्या प्रदेशांत अमलांत असेल त्या सगळ्या कायद्याचा अगर त्याच्या कोणत्याहि भागाचा अमल, केलेलें कोणतेंहि कृत्य अगर केलेला कोणताहि अपराध अगर देणें झालेला कोणताहि दंड अगर गुन्हेगारी अगर सुरू झालेलें कोणतेंहि काम, यांच्या बाबतींत खेरीजकरून त्या प्रदेशांत बंद राहील असा हुकुम करण्याचा स्थानिक सरकारास अखत्यार आहे; आणि असा हुकुम झाल्यानंतर, स्थानिक सरकार त्याविरुद्ध फर्मावी तोंपर्यंत, त्या सगळ्या कायद्याचा अगर त्याच्या त्या भागाचा अंमल तसा बंद राहील.

व्याख्या.

२. विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर या आक्टांत—

(१) "जनावर" या शब्दांत पक्ष्याचाहि समावेश होतो असें समजावें;

(२) "रस्ता" या शब्दांत, सर्व लोकांना जेथें जातां येतें असा रहदारीचा अगर विन रहदारीचा कोणताहि मार्ग, सडक, गल्ली, चवाठा, चौक, अळी, वाट अगर उघडी जागा यांचा आणि कोणत्याहि सार्वजनिक पुलावरच्या अगर बांधावरच्या सडकेचा व पायवाटेचाहि समावेश होतो असें समजावें.

सार्वजनिक जागांत जनावरांचा छळ केल्याबद्दल आणि निष्कारण छळ करून मारिलेलीं जनावरें अशा जागीं विकण्याबद्दल शिक्षा.

३. (१) जो कोणताहि मनुष्य, सर्व लोकांस जेथें जातां येतें अशा कोणत्याहि मोकळ्या अगर बंद केलेल्या रस्त्यांत अगर इतर जागेंत, किंवा कोणत्याहि रस्त्यामधल्या अगर तशा कोणत्याहि जागेंतल्या कोणत्याहि मनुष्याच्या देखत—

(अ) कोणत्याहि जनावरास निर्दयपणें व विनाकारण मारील, वाजवीपेक्षां जास्त हांकील, वाजवीपेक्षां जास्त लादील अगर इतर प्रकारें वाईट रीतीनें वागवील, अगर

(ब) जनावरास विनाकारण वेदना अगर दुःख होई अशा रीतीनें अगर अशा स्थितींत त्यास बांधील अगर नेईल, अगर

(क) छिन्नविच्छिन्न केल्यामुळें, उपासमार केल्यामुळें अगर इतर प्रकारें वाईट रीतीनें वागविल्यामुळें ज्यास वेदना होत आहेत असें कोणतेंहि जीवंत जनावर अगर निष्कारण छळक रीतीनें मारलेलें असें कोणतेंहि जनावर विकायास काढील, मांडील अगर जवळ ठेवील

त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे, अगर साहा महिन्यांच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे, अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

(२) याप्रवर्तीत स्थानिक सरकार ज्या कोणत्याहि कानू करील त्या लागू राहून कोणत्याहि पोलीस अमलदारास, त्याच्या समक्ष जो कोणताहि मनुष्य पोट-कलम (१) याच्या विरुद्ध अपराध करील अगर ज्यावर तसा अपराध केल्याबद्दल आरोप येईल त्यास वारंटाशिवाय धरण्याचा अख्त्यार आहे.

जनावरास कोणतेंहि निष्कारण छळक रीतीनें ठार मारल्याबद्दल शिक्षा.

४. जो कोणताहि मनुष्य कोणतेंहि जनावर निष्कारण छळक रीतीनें ठार मारील, त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे अगर साहा महिन्यांच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा दिली पाहिजे अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या पाहिजेत.

मेहनत करण्यास नालायक अशीं जनावरें कोणत्याहि ठिकाणीं कामावर लावल्याबद्दल शिक्षा.

५. जो कोणताहि मनुष्य, जें कोणतेंहि जनावर कोणत्याहि रोगामुळें, अशक्ततेमुळें, जखमेमुळें अगर क्षतामुळें जें काम अगर श्रम करण्यास नालायक असेल त्यास तें काम अगर श्रम करायास लावील त्यास शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे.

रोग झालेल्या जनावरास सार्वजनिक जागेंत मोकळें सोडण्याबद्दल अगर मरूं देण्याबद्दल शिक्षा.

६. जो कोणताहि मनुष्य आपल्या मालकीच्या कोणत्याहि जनावरास स्पर्शजन्य अगर सांसर्गीक रोग झालेला असतांना त्यास कोणत्याहि रस्त्यांत जाणूनबुजून मोकळें सोडील, अगर आपल्या मालकीच्या रोग झालेल्या किंवा अशक्त झालेल्या कोणत्याहि जनावरास वाजवी कारणाशिवाय कोणत्याहि रस्त्यांत मरूं देईल त्यास पन्नास रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा दिली पाहिजे.

झाडा घेण्याचें वारंट.

७. (१) जर जिल्हा माजिस्ट्रेटास, पोटतुकडी माजिस्ट्रेटास, प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास अगर पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास बातमी समजल्यावरून व त्यास जरूर वाटली ती चौकशी त्यानें केल्यावर, कलम ४ अगर कलम ५ याविरुद्ध अपराध केला जात आहे अगर करण्यांत आला आहे असें मानण्यास त्यास आधार मिळाला तर, त्यास, आपल्या वारंटावरून कान्स्टेबलाहून वरिष्ठ दरजाच्या कोणत्याहि पोलीस अमलदारास त्या वारंटांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याहि जागेंत शिरून तिचा झाडा घेण्यास आणि ज्या जीवंत अगर मेलेल्या जनावराच्या संबंधानें तो अपराध घडत आहे अगर घडला आहे असें मानण्यास त्या पोलीस अमलदारास आधार असेल तें कोणतेंहि जनावर धरण्यास अधिकार देण्याचा अख्त्यार आहे.

फिर्यादीच्या मुदतीची इयत्ता.

(२) सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाअन्वयें ध्यावयाच्या झाड्यां-च्या संबंधाचे त्या कोडांतील ठराव, ते लागू करितां येतील तेथवर, पोट कलम (१) अन्वयें काढलेल्या वारंटाबरहुकुम ध्यावयाच्या झाड्यांस लागू राहतील असें समजावें.

८. या आक्टाविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दलची फिर्याद, तो घडल्याच्या तारिखे-पासून तीन माहने झाल्यानंतर करूं नये.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

जनावरांचा छळ बंद करण्याबद्दलचे विसांपेक्षां जास्त कायदे सध्यां ब्रिटिश इंडियाच्या निरनिराळ्या भागांत अमलांत आहेत. परंतु या कायद्यांपैकीं पुष्कळांची स्थानिक व्याप्ति फारच संकुचीत असून त्यांपैकीं बाकीच्या कांहीं कायद्यांप्रमाणें, जनावरास निर्दयपणें वागविल्यानें लोकांस अडथळा, गैरसोय, त्रास, धोका, भय अगर नुकसान झाल्याचें सिद्ध करणें भाग पडत असल्यामुळें अपराध शाबित करणें फार कठीण पडतें.

या मसुद्याचा उद्देश हा आहे कीं, सहज अमलांत आणण्यासारखा एक कायदा होऊन, तो, कोणत्याहि स्थानिक सरकारास, आपल्या वहिवटींतल्या प्रदेशांपैकीं कोणत्याहि भागांत, जनावरांचा छळ बंद करण्यासाठीं जो कोणताहि इतर कायदा अमलांत असेल तो कायम ठेवून अगर रद्द करून, अमलांत आणितां यावा.

तारीख १९ माहे जानेवारी सन १८९०.

फिल. पी हचिन्स.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS